International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# आदिवासी मराठी साहित्यातील परिवर्तनाची नवी दिशा

**प्रा. सुलोचना रमेश दंतराव**
*मराठी विभाग, श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.*
*Corresponding Author - प्रा. सुलोचना रमेश दंतराव*
**DOI - 10.5281/zenodo.10872792**

***प्रस्तावना :***

*दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य या वाङ्मयीन प्रवाहाबरोबरच १९७० च्या दशकानंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचा स्वतंत्र परिवर्तनवादी साहित्यप्रवाह निर्माण झाला. आदिम काळापासून आदिवासी जमातीत मौखिक साहित्य परंपरा आढळते. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे आदिवासी जमातीतून संवेदनशील, जागृत, आत्मभान प्राप्त झालेली साहित्यिकांची पिढी निर्माण झाली. या पिढीने आदिवासी जमातीचे वास्तववादी जीवनचित्रण कथा, कादंबरी आत्मकथन, कविता या साहित्य प्रकारातून मांडले.*

*परिवर्तन हा मानवी जीवनाचा गुणधर्म आहे. तसेच साहित्याचे ही आहे. परिवर्तनाच्या दृष्टीकोनातून पाहताना विविध साहित्य प्रवाहांची वैशिष्ट्ये लक्षात येतात तेच आदिवासी साहित्याच्या बाबतीत सांगता येईल.*

***पारिभाषिक शब्द :*** *दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य*

**आदिवासी साहित्य म्हणजे काय** ?

विनायक तुमराम यांनी आदिवासी साहित्याबद्दल म्हटले आहे, 'केवळ आदिवासीनीच लिहिलेले साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य नव्हे, तर आदिवासींच्या सांस्कृतिक मूल्यांसकट त्यांचे सर्वांगीण हित जपणारे जे-जे प्रतिभावान असतील त्या सर्वांना आदिवासी दृष्टीकोनातून लिहिलेले साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय '.

विद्रोही कवी वाहरू सोनवणे, आदिवासी साहित्य निर्मिती बददल सांगताना म्हणतात, 'आदिवासी साहित्याचा उगम आदिवासी लोककथा, लोकगीते, लोकनाटय व त्यातील बोलीभाषा त्यातील शब्द म्हणजे आदिवासी साहित्य होय '.

**आदिवासी कवितेतून व्यक्त होणाऱ्या परिवर्तनावादी जाणिवा :**

आदिवासी कवितेची सुरुवात १९८० साली. संपादित केलेल्या 'मोहोळ (संपा. भुजग मेश्राम, प्रभु राजगडगर) या काव्यसंग्रहापासून झाली. पण १९९० नंतर आदिवासी कवितेचे दालन अतिशय समृद्ध होत गेलेले दिसते, शब्दांच्या माध्यमातून अनेक कवी आपल्या भावना व्यक्त करू लागले. कवी वाहरु सोनवणे, कवी विनायक तुमराम कवी भुजंग मेश्राम, कवी चामुलाल राठवा, कवी सुनिल कुमरे कवी माधव सरकुंडे कवी बाबाराव

मडावी, कवी संजय लोकरे कवी तुकाराम धांडे कवयित्रीमध्ये उषाकिरण आत्राम कुसुम आलाम अशा अनेक कवींनी आपल्या कवितामधून परिवर्तनवादी जाणिवा व्यक्त केले आहेत.

प्राचीन काळापासून हिंदू मुस्लिम, बौद्ध धर्मीयांनी आपआपल्या धर्मरक्षणासाठी वेळोवेळी जसे लढे दिले तसे लढे उभारण्याची आदिवासी समाजाला गरज आहे, असा विचार मांडताना कवी सुनील कुमरे आपल्या विश्लेषण या कवितेत म्हणतात.

'आपण जसे लंगोटी चिरगुट कुठपर्यंत सांभाळायचे
भेदला पाहिजे तिरकामठयांनी आजवरचा
काळोख जय उलगुलान!

हजारो पिढ्यांनी सहन केलेला अन्याय, सोसलेले दुःख कवीला असाह्य होत आहे म्हणून आता जय उलगुलान नारा दिलाच पाहिजे अशी भूमिका कमी मांडतो.

आदिवासी समाज हा पारंपरिक जिणं नाकारून परिवर्तनास तयार असल्याचे 'परिवर्तन' या कवितेतून दिसून येते दारू हा आदिवासी संस्कृतीचा पूजनीय विषय असला तरी दारुचा त्याग करुन नवपरिवर्तनास तयार होण्याचे कवी आवाहन करतात. संसार उद्ध्वस्त करणारी दारू आहे. तिचे पारंपरिक संदर्भ बदलायला हवे असे कवीला वाटते.

दारू म्हणजे संस्कृती
दारू म्हणजे शितटाचार
दारू म्हणजे माझ्या मायेचे उद्ध्वस्त जग
दारु म्हणजे माझ्या आदिवासींचे उदध्वस्त जग

कोणताही समान नवा बदल स्वीकारण्यास लवकर तयार होत नाही. आदिवासी समाजही त्याला अपवाद नाही. या आदिवासी समाजाने आपल्या जीवनशैलीत व विचारशैलीत परिवर्तन घडवून आणायचे असेल तर समाजबदलाच्या चळवळीत सहभागी व्हावे असे कवीला वाटते.

कवी तुकाराम धांडे, त्यांच्या कवितेतून पाझरणार डोंगरदऱ्यातील आदिवासी समाजाचं जीवन रेखाटलं आहे. हे जीवन खरोखरच आदिवासी कवितेला नवी दिशा देणार आहे. 'देव' या संकल्पनेबद्दल त्यांचा विचार त्यांच्या 'नियमेश्वरा' या कवितेतून प्रकट झाला आहे.

'बा! निसर्ग देवा
तू लई मोठा, तुव्हा केवढा पसारा
तू लई जुना, पण तुझ्यापुढं निव्वळ भुस्काट सगळ्या
देवांनाही तुझ्या नियमाप्रमाणं वागावं लागत'

निसर्गाशिवाय कोणताच देव मोठा नाही. हे आपल्या कवितेतून व्यक्त करतात.

कवी संजय लोहकरे आपल्या 'कलम' या कवितेतून निसर्गधर्माची जपवणूक करण्याचे सूचित करतात. ते आपल्या कवितेत म्हणतात,

'आमच्या धर्माची मूलतत्वे
मूळापासून उखडणाऱ्या व्यवस्थेत
पुन्हा कलम करू लागतो ?
निसर्ग धर्माच्या मुळांना'

निसर्ग हा आदिवासींचा मूळ धर्म मानण्यात येत असला तरी आदिवासींच्या धर्माबद्दल विविध मतप्रवाह आहेत. निसर्ग धर्माच्या मूळांना घट्ट करायला हवे असे कवी सुचविताना दिसतात.

आदिवासींचा निसर्ग व संस्कृती मुळापासून उखडून टाकण्याचा चंग बांधलेल्या प्रस्थापित व्यवस्थेविषयी कवी चामुलाल राठवा आपल्या 'खाऊ दया हो' या कवितेत

'अरे आदिवासी बंधुंनो जागा
त्यांनी तुमच्याकडचं संपवलं
संपवतील तुम्हालाही
तुम्ही नुसते बघत राहाल
अन् बघता बघता संपून जाल'

आदिवासी समाजाला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून अन्याय सहन न करता जागृत होण्याचा सल्ला देतात.

आदिवासी लोकांमध्ये मूळ विराजमान असलेल्या आदिम तत्वाची जाणीव करून देतात. कवयित्री कुसुम आलाम आपल्या 'लढण्यास सज्ज' या कवितेमध्ये म्हणतात,

'हसती कसे अघोरी
माझ्या फाटक्या जिंदगीला
संदर्भ आदिम रक्ताचे
वदण्यास मी निघाले'

'आदिवासी' म्हणून हिणवणाऱ्यांना व आदिवासींच्या जीवनमानाला व राहणीमानाला हसणाऱ्या प्रस्थापितांना आता सडेतोडपणे उत्तर देण्याची व रक्तातील आदिमतेचे संदर्भ उलगडून दाखविण्याची वेळ आली आहे. असे कवियित्री नमूद करतात.

कवी मनोहर मोहरे 'वंचित' या कवितेत म्हणतात

नका घेवू हिरावून, सवलती न अनुदान
आहे वंचित अजून आदिवासीचे जीवन'

देशाला स्वातंत्र्य मिळून कितीतरी काळ लोटला आहे. तरीही अजुनही आदिवासी वंचितच आहेत. वर्षानुवर्षे शोषणाला बळी पडला आहे. आता कोठपर्यंत हे सहन करायचे आता प्रतिउत्तर दिले पाहिजे.

पुढील कवितेत कवी म्हणतो आहे-

'आता घेऊया शिक्षण घेऊ झेप विलक्षण
केले कुणी का शोषण, कसे करू मी सहन

होणारा अन्याय, अत्याचार मी सहन करणार नाही तर शिक्षण घेऊन प्रगतीची एक विलक्षण झेप घेऊ असा आशावाद कवी व्यक्त करतात.

आधुनिकता स्वीकारणारा कवी वाहरू सोनवणे यांची कविता आदिवासी समाजाला आत्मभान प्राप्त करून देणारी आहे.

'मन रमत नाही सांगू नका
नको ते वहाणे करू नका
बंधन वाटते तिथे राहू नका
जिथे जायचे तिथे जावा'

ही कविता आदिवासी समाजाला दिशादर्शक आहे. बंधनात अडकून पडलेल्या आदिवासी समाजाला ते आधुनिकतेचा स्वीकार करायला सांगतात.

आदिवासी समाजात कांतीची पोकळ भाषा करणाऱ्यांना विद्रोही कवी वाहरू सोनवणे यांची 'पोकळ बुडबुडे कशाला' या कवितेमधून म्हणतात.

'दिशा देण्याची बात करता,
दया दिशा, ठिगळे जोडत बसू नका
मूळात घाव घाला
आगीत चालत जावं लागेल,

चालत जावा
सूं सूं गोळया सुटल्या तरी
रक्ताचा झेंडा फडकवत जावा'

समाज विकासाच्या नावाखाली मलिदा लाटणारे कार्यकर्ते वाडया-पाडयातून पहावयास मिळतात, परंतु प्रामाणिकपणे लढणारा एखादाच कार्यकर्ता असतो. हे सांगतानाच 'नुसत्या बाता मारू नका तर मुळात घाव घाला' असे ठामपणे सांगताना वेळ प्रसंगी छातीवर गोळया झेलण्याची तयारी ठेवा. असे कवी सांगतो आहे.

आज आदिवासी समाज शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्टया परिवर्तन करताना दिसून येत आहे. वैचारिक मंथन होत आहे. समाज परिवर्तन घडण्यास साहित्य हे उपयुक्त व प्रभावी माध्यम आहे. विसाव्या शतकामध्ये कवी वाहरू सोनवणे यांनी आदिवासी समाजाला व्यासपीठ न मिळाल्याची खंत आपल्या 'स्टेज' या कवितेतून व्यक्त केली आहे. परंतु २१ व्या शतकात परिस्थिती बदललेली दिसून येत आहे. आदिवासी समाजाला हक्काचे स्टेज मिळत आहे. किंबहुना ते मिळविण्याचा प्रयत्न आदिवासी समाज करत आहे.

**निष्कर्ष :**

- आदिवासी कवींनी आपल्या लेखनात प्रखर वास्तवाच्या जाणीवा मांडल्या आहेत.
- कवितेतील लेखनाची परिभाषा कशी बदलत जाते हे जाणवले.
- आदिवासी जीवनातील परिवर्तनाची दिशा कोणती हे या कवितांमधून दिसून येते.
- आदिवासी समाज शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टया कसा बदलत गेला हे या कवितांमधून जाणवले.
- प्रत्येक कवीच्या कवितेतून समाजपरिवर्तनाची आस व तळमळ दिसते.
- आदिवासी समाजाला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे आदिवासी साहित्य आहे.
- आदिवासी साहित्याच्या दालनातील आदिवासी कविता समृध्द आहे.
- आदिवासी कविता पारंपरिक गोष्टींचा त्याग करून परिवर्तन स्वीकारते.

**संदर्भग्रंथ :**


1. भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृतीगोविंद गारे .डॉ -
2. आदिवासी साहित्य .एक अभ्यास डॉ : ज्ञानेश्वर वाल्हेकर
3. आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन - विनायक तुमराम .डॉ